महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

जनसंपर्क विभाग : महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
'प्रकाशगड', प्लॉट क्र. जी-९, प्रो. अनंत काणेकर मार्ग, ४ था मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
संकेतस्थळ : www.mahadiscom.in दूरध्वनी : ०२२-६९८५२२०० ईमेल-prodiscomm@gmail.com
टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३४३५, १८००-२१२-३४३५, १९१२, १९१२० Follow us on :

<u>प्रेसनोट - दि. 14 डिसेंबर 2025 (मराठी व इंग्रजी)</u>

# महावितरणने एका झटक्यात फेडले १२,८०० कोटींचे कर्ज

**मुंबई, १४ डिसेंबर २०२५:** देशातील सर्वात मोठी वीज वितरण कंपनी असलेल्या महावितरणने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या १२,८०० कोटी रुपयांच्या कर्जाची मुदतीपूर्वी एकाच हफ्त्यात नुकतीच परतफेड केली. अन्य वित्तीय संस्थेकडून कमी व्याज दराचे कर्ज उभारून तसेच स्वनिधीतून ही परतफेड केली असून त्यामुळे व्याजाच्या रकमेत मोठी बचत होईल, अशी माहिती अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणला आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्याची सूचना केली असून त्यादृष्टीने कंपनीवरील कर्जाचा बोजा हलका करण्यासाठी यशस्वी पावले टाकण्यात आली.

महावितरणने विविध टप्प्यांवर स्टेट बँकेकडून एकूण १२,८०० कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते. त्यासाठी ८.६५ टक्के ते ९.२५ टक्के दराने व्याज द्यावे लागत होते. त्याऐवजी अन्य वित्तीय संस्थेकडून ७,१०० कोटी रुपये कर्ज ८.२५ टक्के इतक्या कमी व्याजदराने उभारून महावितरणने स्टेट बँकेचे ७,१०० कोटी रुपयांचे कर्ज फेडले. त्या खेरीज महावितरणने स्वनिधीतून ५,६३४ कोटी रुपयांचे स्टेट बँकेचे कर्ज फेडले.

महावितरणने स्टेट बँकेचे कर्ज घेताना आपल्या दहा सर्कलमधील महसूल तारण म्हणून ठेवला होता. या सर्कलमध्ये वार्षिक तीस हजार कोटी रुपयांचा महसूल आहे. स्टेट बँकेचे सर्व कर्ज फेडल्यामुळे हा महसूल तारणमुक्त होईल. त्या आधारे कंपनीला ५०,००० कोटी रुपयांपर्यंतचा निधी माफक व्याजदरात कर्जरुपाने उभा करता येईल.

**महावितरणची पत वाढविणारे पाऊल** - महावितरणने एकाच हफ्त्यात स्टेट बँकेच्या १२,८०० कोटी रुपयांच्या कर्जाची मुदतपूर्व परतफेड करण्यामुळे कंपनीची वित्तीय बाजारातील पत वाढली आहे. ही घडामोड गुंतवणूकदारांचा विश्वास वाढविणारी आहे. कंपनीसाठी भविष्यात खासगी किंवा सार्वजनिक बाँड उभारायचे झाल्यास त्यासाठीही इतक्या मोठ्या कर्जाची परतफेड करणे उपयुक्त ठरणारे आहे. आगामी काळात महावितरणला शेअर बाजारात सूचिबद्ध करण्याच्या दृष्टीनेही ही कर्जाची परतफेड महत्त्वाची आहे.

-------------------------------

# Mahavitaran repays Rs. 12,800 crore loan in one go

**Mumbai, 14th December 2025:** Maharashtra State Electricity Distribution Company Limited (Mahavitaran), the country's largest electricity distribution company, recently

repaid a loan of Rs 12,800 crore from State Bank of India in a single instalment before the due date. Chairman and Managing Director (CMD) Lokesh Chandra informed that the loan was repaid by raising a low-interest loan from another financial institution and from company's own funds, thus saving interest amount substantially.

Hon'ble Chief Minister Devendra Fadnavis has instructed to make Mahavitaran financially stronger and in this regard, successful steps have been taken to lighten the debt burden on the company.

Mahavitaran had taken a total loan of Rs 12,800 crore from State Bank at various stages. For this, it had to pay interest at a rate of 8.65 percent to 9.25 percent. Instead, Mahavitaran paid off the State Bank's Rs 7,100 crore loan by raising a loan of Rs 7,100 crore from another financial institution at a low interest rate of 8.25 percent. Apart from that, Mahavitaran paid off a State Bank loan of Rs 5,634 crore from its own funds.

While taking the State Bank loan, Mahavitaran had kept its revenue from ten circles as collateral. These circles have an annual revenue of Rs 30,000 crore. After paying off all the State Bank loans, this revenue will be free from collateral. On that basis, the company will be able to raise funds of up to Rs 50,000 crore in the form of loans at a moderate interest rate.

**A step that increases creditworthiness -** Mahavitaran's prepayment of a State Bank loan of Rs 12,800 crore in a single instalment has increased the company's creditworthiness in the financial market. This development will increase the confidence of investors. If the company wants to raise private or public bonds in the future, it will be useful to have repaid such a large loan for that too. This repayment of the loan is also important in terms of listing Mahavitaran in the stock market in the future.

----------------------------